MHGA130002872024

सत्र मामला क्र.३५/२०२४
महा.शासन मार्फत पोलीस
स्टेशन, गटट्ा जांबीया
वि. राजु कोकोशी जोई व इतर

निशानी ०३ वरील आदेश
(दि.११/१०/२०२४)

१. अर्जदार/आरोपी क्र. १.राजु कोकोशी जोई,२. मैनु डुंगा जोई,३. दिनकर बाजु जोई,४. शंकर राजु जोई,५. रैनू मालु पुंगाटी,६. झुरु मालु पुंगाटी,७. बाजु कोकोशी जोई आणि ८. विनु मुरा होळी सर्व रा. जांबीया,ता. एटापल्ली, जि.गडचिरोली यांनी कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे गटट्ा जांबीया पोलीस स्टेशन येथील अप. क्र. ०१/२०२४ मध्ये भा.दं.वि. कलम ३०७,३४१,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६ सहकलम ३(२) महा.नरबळी आणि अमानुष अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोना प्रति. अधि. २०१३ अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये नियमीत जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे.

२. अर्जदारांचे असे म्हणने आहे की, सदर प्रकरणाशी त्यांचा कोणताही संबध नाही. त्याना खोट्या गुन्हयात गोवले आहे. त्यांना अटक केले परंतु त्यांना गुन्ह्यात गोवणारा पुरावा तपासी अमलदारला मिळाला नाही. प्रकरणातील जखमी रुग्णालयातुन सुटट्ी झाली असून तो चांगल्या अवस्थेत आहे. प्रकरणातील बहुतांश तपास हा पुर्ण झाला आहे.अर्जदारं हे निष्पाप व अशिक्षीत असून त्यांचा पुर्व इतिहास हा निष्कलंक आहे.जो गुन्हा सदर आरोपींनी केला नाही त्या गुन्हयामध्ये ते गजाआड आहेत. त्यामुळे त्यांना मा. न्यायालयाचे शर्ती व अटीनुसार जामीन देण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. सरकारी वकीलांना यांनी सदर अर्ज नि.३ च्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दिले की, त्यांनी सदर अर्जास विरोध केला आहे. सदर आरोपींनी गंभीर गुन्हा केला आहे. सदर प्रकरणात गावकरी हे साक्षदार आहेत. प्रकरण हे दोषारोप निश्चिती करीता आहे. जर त्यांना जामीन दिल्यास ते पिडीतावर व गावक—यांवर दबाव आणतील. त्यापैकी कोणी समोर साक्ष

देण्यास येणार नाही. करीता वरील कारणांमुळे आरोपीचा जामीन अर्ज नामंजुर करण्यात यावा ही विनंती करण्यात येते.

४. गुन्हयाची हकीकत अशी की, दि. २६.४.२०२४ चे रात्री ८.०० वा. चे सुमारास या प्रकरणातील आरोपी नामे राजु कोकोसा जोई, बाजु कोकोसी जोई, मैनु डूंगा जोई, दिनकर बाजु जोई, विनु होळी,शंकर जोई, रैनू पुंगाटी, झुरु पुंगाटी यांनी दोन महिन्यापुर्वी डोंगा यास फिर्यादीने जादुटोना करुन ठार मारल्याच्या संशयावरुन फिर्यादीचे घरी जाउन त्याचे हातपाय बांधून त्याला उचलून गावातील गोटूलमध्ये नेले व तेथील एका खांबाला दोरीने बांधून हाताबुक्क्याने व काठीने मारहान केले तसेच शिवीगाळ करुन जिवे ठार माण्याची धमकी दिली. फिर्यादीला जिवे ठार मारण्याच्या उदद्शाने लोखंडी सब्बल गरम करुन हाता पायाला,छातीला, डोक्याला,पाठीवर व चेह—याला चटके दिले. तसेच फिर्यादीला रात्रभर खांब*ाला बा*धून ठेवून मारहान केले. त्यामारहानीमुळे फिर्यादी बेशूध्द झाला असता तो मयत झाला असे समजुन त्याला तेथे बांधून ते निघून गेले.

५. अर्जदार/आरोपीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की, गुन्हयाचा तपास पुर्ण होउन दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. तक्रारमध्ये नमुद कण्यात आलेल्या आरोप साक्षदारांचे बयानाशी मिळते जुळते नाही. पिउीतने वेगळे बयान दिले असून पिडीतचे मुलाने वेगळे बयान दिलेले आहे. अशाप्रकारे अभियोग पक्षाने केलेल्या आरोपीमध्ये फार मोठया प्रमाणात विसंगती आहे. केलेल्या आरोपाप्रमाणे कलम ३०७ भा दं वि प्रमाणे आरोपींनी गून्हा केलेला आहे. तक्रार नोंदविण्यात विलंब झालेला आहे.

६. घटना घडल्यानंतर आरोपी हे फरार झालेले नाही. पोलिस पाटलाने दिलेल्या निरोपावरुन आरोपी हे पो स्अेशनला गेले व पोलिसांना सहकार्य केले. दोषारोप पत्र दाखल झाल्याने त्याचेकडून कोणताही प्रकारचा तपास अथवा जप्ती करणे बाकी नाही. त्यामुळे अर्जरांना गजाआड ठेवण्यापेक्षा त्यांना जामीन मंजुर करण्यात यावे अशीव विनंती करण्यात आली.

७. याउलट सरकारी वकिल श्री कुंभारे यांनी असा युक्तीवाद मांडला की, घटना ही गावातील असून घटनेचा प्रकार अमानवीय आहे. या घटनेतील साक्षदार हे गावातील लोकं असल्याने आरोपींना जामीन दिल्यास ते पिडीता तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षदार यांच्यावर

दबाव आणण्याची शक्ता नाकारता येणार नाही. तपास पुर्ण झाल्याने प्रकरण जलद गतीने चालविणे फिर्यादी व आरोपी पक्षांकरीता फायदेशीर राहील करीता आरोपीचा जामीन अर्ज फेटाळण्यात यावे अशी विनंती करण्यात आली.

८. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, या घटनेचे माया पुंगाटी व सोनी पुंगाटी हे प्रत्यक्षदर्शी साक्षदार आहेत. मुख्य म्हणजे बाजु जोई हिचा मृत्यू जखमी याने केलेल्या जादु टोनाने झाला या संशयावरुन घटना घडल्याचे दिसून येते. फिर्यादीला त्याचे घरुन पकडून आरोपीने मारहान केली तसेच त्याला शिवीगाळी करुन त्याचे दोन्ही हात दोरीने बांधले त्याला फरफटत ओढत गावाच्या गोटूल चौकात आणले आणि तिथे लाकडी खांबाला बांधले. जर आरोपींनी फिर्यादीने जादु टोना केला व त्यामुळे बाजु जोईबाईचा मृत्यू झाला असा संशय होता तर त्यांना पोलिसांकडे रितसर तक्रार करणे अपेक्षीत होते, परंतु आरोपींनी कायदा हातात घेउन मारहानीचा केलेले कृत्य अमानविय प्रकारचा आहे.

९. जेव्हा एखादी घटना अमानविय प्रकारची होते व त्या घटनेत अनेक आरोपी सामील असतात तेव्हा नेमकी घटना कशाप्रकारे व कशी झाली तसेच कोणत्या आरोपीने कोणत्याप्रकारे सहभाग गुन्हयात घेतला हे सांगने कठीन असते व त्यामुळे बयानात विसंगती असेल तर त्याचा उहापोह फक्त साक्षदारांचा साक्षे नोदवून उलट तपासाअंती करता येईल. त्यामुळे बयानात तफावत आहे हे कारण जामीन मिळयाकरीता पुरेसे आहे असा जो युक्तीवाद अर्जदाराच्या वतीने करण्यात आला तो सद्विवेक बुध्दीला न पटण्यासारख आहे.

१०. फिर्यादीला हातपाय बांधून चौकात आणले त्यानंतर त्याला लकडी खांबाला बांधून लोखंडी सब्बल गरम करुन आरोपींनी फिर्यादीचे अंगावर ठिकठिकाणी चटके दिले तसेच त्याला मिरचीचा धुवा दिला यामुळे आरोपींनी केलेला प्रकार अमानविय आहे असा जो सरकारी वकीलाचा युक्तीवाद आहे त्यात तथ्य दिसून येते.

११. आरोपीचे वतीने असा युक्तीवाद मांडला की, असलेले जखमेवरुन कलम ३०७ भा.दं.वि प्रमाणे आरोपींनी गुन्हा केलेला नाही. मुख्य म्हणजे आरोपींनी फिर्यादीला उन्हात दिवसभर खांबाला बांधून ठेवले. त्याला गरम सब्बलने चटके दिले तसेच त्याला

मिरचीचा धुवा दिला आणि दिवसभर अन्न व पाणी न देता त्याला उपाशी ठेवले. त्यामुळे आरोपींचा फिर्यादीचा जिव घेण्याचा होता हे उघडपणे दिसून येते असा पुरावा तपासणी अधिका—याने गोळा केलेला आहे. त्यामुळे अंगावर असलेल्या जखमेच्या आधारे आरोपींनी कलम ३०७ भा दं वि प्रमाणे गुन्हा केला नाही हा जो युक्तीवाद आरोपीच्या वतीने मांडण्यात आला त्या तथ्य नाही.

१२. या प्रकरणात आरोपी व अभियोग पक्षाचे साक्षदार हे एकाच गावातील असल्याने तसेच घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षदार असल्याने आरोपींना जामीन दिल्यास ते त्याच्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याची शक्यता नाकारता येणार नाही. जेव्हा गुन्हयाचा तपास पुर्ण होउन दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहे तेव्हा प्रकरण जलद गतीने चालविल्यास अभियोग पक्ष व आरोपीं यांना त्याचा फायदा होउ शकतो. अशा परिस्थीतीत आरोपींना जामीन मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. करीता मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. जामीन अर्ज नि.क्र. ३ नामंजुर करण्यात येतो.

२. सरकारी वकीलांनी प्रकरण जलद गतीने चालविण्याचे प्रयत्न करावे व बचाव पक्षाने त्यांना सहकार्य करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAVISHANKAR NAMDEORAO BAWANKAR
Date: 2024.10.11 18:00:57 +0530

अहेरी.
दि. ११/१०/२०२४

(र. ना. बावनकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
अहेरी.